विषय:- मत्ता व दायित्व यांची वार्षिक
विवरणे सादर करणेबाबत..

सातारा जिल्हा परिषद सातारा
सामान्य प्रशासन विभाग
परिपत्रक क्रमांक आस्था २(३)/कावि-९४३/२०२५
दिनांक:- मार्च २०२५

## परिपत्रक

मा. प्रधान सचिव महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेककडून शासन निर्णय क्रमांक: वशिअ - १२१४/प्रक्र.५१(२) ११ दि.१७ नोव्हेंबर २०१४ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम,१९७९च्या नियम १९ मधील व महाराष्ट्र जिल्हा परिषदा,जिल्हा सेवा, (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम १७(३)(४) मधील तरतुदीनुसार प्रत्येक शासकीय अधिकारी/कर्मचारी (गट ड मधील कर्मचारी वगळून) कोणत्याही सेवेतील /पदावरील त्याच्या प्रथम नियुक्तीच्या वेळीच त्यानंतर शासनाने विहीत करेल त्या त्या वेळी विहीत नमुन्यात त्याचे मत्ता व दायित्व याबाबतचे विवरणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.सदर विवरण सादर करण्याबाबत शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दिनांक ०२ जून २०१४ मधील दिलेल्या सूचनाप्रमाणे सादर करणेबाबत कळविलेले आहे.

या परिपत्रकान्वये असे कळविणेत येत आहे की, सातारा जिल्हा परिषद विविध विभागांतर्गत कार्यरत असणारे गट - अ , गट -ब व गट -क चे सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दि.०२ जून २०१४ अन्वये यापूर्वी प्रथम सेवाप्रवेशाच्या वेळेची मालमत्ता व दायित्वाबाबतची विवरणपत्रके सादर केलेली नाही, अशा सर्व अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती / आश्वासित प्रगती योजनतील लाभ देणेत येऊ नये,असे नमूद आहे. त्याप्रमाणे विवरणपत्रके उपरोक्त नमूद केलेल्या शासन आदेशासोबत सादर केलेल्या प्रपत्रामध्ये दिनांक ३१/०५/२०२५ पर्यंत कार्यालयप्रमुखांस सादर करावीत. प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्चच्या स्थितीस अनुसरुन असे विवरणपत्रे त्या त्या विभागाच्या आस्थापना विभागास जतन करावीत व केलेल्या कार्यवाहीचा संख्यात्मक अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.

तसेच सदर मत्ता व दायित्व संख्यात्मक माहिती गुगल स्प्रेडशीटला भरावी. सदर बाबत विलंब झालेस अगर कसूर केलेस प्रशासकीय कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी. तसेच खातेप्रमुख यांनी आपले अधिनस्त संवर्गातील कर्मचारी यांचा एकत्रित अहवाल सादर करणेची दक्षता घ्यावी.

Signed by
Yashni Nagarajan
Date: 24-03-2025 17:41:41

यशनी नागराजन,भा.प्र.से.,
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद सातारा

प्रति,

खातेप्रमुख /गट विकास अधिकारी (सर्व)
सातारा जिल्हा परिषद सातारा

प्रत :- अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.सातारा.
प्रत :- प्रकल्प संचालक, जि. ग्रा. वि. यंत्रणा सातारा.